Vol III Issue V June 2013
Impact Factor : 0.2105 ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-chief
H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 5, June. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# '' पिंपरी –चिंचवड शहरातील हॉटेल व्यवसायातील बालकामगारांचा आर्थिक व सामाजिकदृष्टया अभ्यास ''

*अंकुश दादाराव काळे , के.एच.शिंदे*

पीएच.डी.संशोधक विद्यार्थी एस.एस.जी.एम.कॉलेज, कोपरगांव, अहमदनगर,
एस.एस.जी.एम.कॉलेज, कोपरगांव, अहमदनगर,

***सारांशः***

बालमजुरी ही एक गुंतागुंतीची आर्थिक समस्या आहे. तिची सांस्कृतिक आणि सामाजिक पाळेमुळे ही खोलवर रुजलेली आहेत. तसेच अल्पवयीन मुलांना कामाला लावले जाण्याची समस्या केवळ पाश्चिमात्य, विकसित देशांपुरतीच मर्यादित नाही, तर ते जगातील सर्व देशांत ती कमी अधिक प्रमाणात आढळते. मोठया प्रमाणावर झालेल्या औद्योगिकीकरणाचा तो एक दुष्परिणाम आहे. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे कामगारांच्या वाढत्या गरजामुळे बालकामगारांच्या स्वरूपात स्वस्त कामगारांचा पुरवठा मालक वर्गास उपलब्ध झाला. नवनवी तंत्रज्ञान, बाजारपेठेचा विस्तार जागतिक व्यापारातील हिस्सा यामध्ये सातत्याने वाढ होत आहे.

### प्रस्तावना :

आशिया खंडात चीन नंतर एक महत्वाची अर्थव्यवस्था म्हणून भारताकडे बघितले जाते. जगातील एकूण लोकसंख्येच्या 17.5 लोक भारतात राहतात. परंतु एवढे सगळे असतानाही आजही भारतासमोर अनेक समस्या उभ्या आहे. यामध्ये वाढती, लोकसंख्या, बेकारी, दारिद्रय, आर्थिक विषमता, कुपोषण, स्त्रीभ्रूण हत्या, बलात्कार, शेतकरी आत्महत्या, वाढती महागाई व बालकामगार इत्यादी समावेश होतो. स्वातंत्र्याचा 65 वर्शानंतर ही भारतातील या सामाजिक व आर्थिक समस्या दूर झाल्या नाही. आजही या समस्या भारतात अत्यंत ज्वलंत आहेत. या वरील समस्यापैकी बालकामगार ही समस्या देखील अत्यंत गंभीर आहे. बालकांची सर्वाधिक संख्या असलेला भारत हा जगातील पहिला क्रमाकांचा देश आहे. म्हणून भारताला तरुण देश म्हणले जाते. 2020 पर्यंत भारत आर्थिक महासत्ता बनू पाहत आहे. तर यामध्ये बालकामगारांच्या भविश्याचे काय ?ज्यांच्या हातात देशाचे उद्याचे भविश्य आहे जर त्यांचें भवितव्य धोक्यात असेल तर देशाचा विकास कसा घडवून येईल. जोपर्यंत बालकामगाराचे प्रमाण कमी होत नाही. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले जात नाही तो पर्यंत देशाच्या सर्वांगीण विकास होउ शकत नाही. कारण शिक्षणाचे प्रमाण वाढल्याशिवाय विकास होवू शकत नाही.

### बालमजुरांची व्याख्या :

1.पोटाची खळगी भरण्यासाठी वेठबिगाराप्रमाणे जो राबतो तो मजूर आणि अल्पवयात जबरदस्तीने किंवा परिस्थितीमुळे मजुरी करायला लागतो, राबायला लागतो तो बालमजूर म्हणजे 8 ते 14 वर्षांच्या आतील जी मुले कामे करतात त्यांना बालकामगार असे म्हणतात. '
2.स्वतःची किंवा कुटूंबाची गरज म्हणून पैसे (मजुरी) मिळविण्यासाठी कराव्या लागणा–या कामामुळे जर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या बालक–बालिकेच्या शिक्षण व विकासावर विपरीत परिणाम होत असेल, तर अशा कामाला बालमजुरी म्हणावे. '

### उद्दिश्टे :

1.हॉटेल व्यवसायातील बालकामगारांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

### गृहीतके :

1.हॉटेल व्यवसायातील बालकामगार कुटुंबाची स्थिती अतिशय गरिबीची आहे.
2.हॉटेल मध्ये काम करत असताना बालकामगाराला विविध समस्याचा सामना करावा लागता.

### संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा वापर केला आहे, त्यामध्ये पिंपरी–चिंचवड शहरातील हॉटेल मध्ये काम करणा–या बालकामगारांची सोईस्कर किंवा सुविधाजनक नमुना निवड पध्दतीचा वापर करून 80 बालकामगारांकडून प्रश्नावलीच्या साहयाने माहिती संकलीत केली आहे, तसेच अर्थशास्त्रासंबंधित संदर्भग्रंथाचा संशोधनासाठी वापर केला आहे.

**Title :** *'' पिंपरी –चिंचवड शहरातील हॉटेल व्यवसायातील बालकामगारांचा आर्थिक व सामाजिकदृष्टया अभ्यास ''*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ]** *अंकुश दादाराव काळे , के.एच.शिंदे* **yr:2013 vol:3 iss:5**

अ)बालकामगारांची सामाजिक परिस्थीती :

1.सामाजिक वर्गवारी :

हॉटेल व्यवसायात काम करणा–या बालकामगार कुटूंबाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे ही अल्पवयीन मुले हॉटेल मध्ये काम करू लागतात. काम करत असतांना हे बालकामगार नेमकया कोणत्या सामाजिक वर्गवारीतील आहेत, तसेच त्या बालकामगारांचा वयोगट कोणता, बालकामगारांना मिळणारा दरमहा पगार किती, हॉटेल मधील कामाचा प्रकार कोणता याविषयी माहिती पुढील तक्ता क्र.1 दर्शविली आहे

तक्ता क्र.1

बालकामगारांची सामाजिक वर्गवारी

| समाजिक वर्गवारी | कुटुंबे | टक्केवारी |
|---|---|---|
| अनुसूचित जाती | 13 | 16.25 |
| अनुसूचित जमाती | 16 | 20.00 |
| भटक्या / विमुक्त जाती व जमाती | 11 | 13.75 |
| इतर मागास वर्ग | 11 | 13.75 |
| खुला प्रवर्ग | 29 | 36.25 |
| एकूण बालकामगार | 80 | 100 |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र.1 असे दिसून येते की, पिंपरी–चिंचवड शहरातील संशोधनासाठी निवडलेल्या 80 बालकामगारांचे वर्गीकरण केले असता, सर्वाधिक खुला प्रवर्गातील 29 (36.25 टक्के) बालकामगार असून, अनुसूचित जमातीतील 16 (20 टक्के), अनुसूचित जातीतील 13(16.25 टक्के), तर भटक्या विमुक्त जाती व जमाती व इतर मागास वर्गातील अनुक्रमे 11 ;13.75 टक्केद्ध व 11 (13.75 टक्के) बालकामगार काम करतांना दिसून आले.

1.बालकामगारांचा वयोगट :

हॉटेलमधील काम हे बालकामगाराच्या दृष्टीने शारीरिक कष्टाचे असते. कामाची वेळ निश्चित नसल्याने रात्री उशिरापर्यंत काम करावे लागते. अतिशय कमी वयाच्या बालकामगारांकडून साफसफाई, भांडी धुणे व व इतर स्वरूपाची कामे करून घेतली जातात. म्हणून या कामात किती वयातील बालकामगार आहेत. याविषयी माहिती मिळवून ती पुढील तक्ता क्र. 2 मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र.2

बालकामगारांचे वयोगटानुसार वर्गीकरण

| वयोगट | बालकामगारांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 8 ते 10 वर्षे | 09 | 11.25 |
| 11 ते 14 वर्षे | 71 | 88.75 |
| एकूण | 80 | 100 |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. 2 वरून असे दिसून येते की, हॉटेल व्यवसायातील काम करणा–या बालकामगारांच्या वयाचा विचार केला असता सर्वाधिक 11 ते 14 वयोगटातील 71 ( 88.75टक्के) बालकामगार होते, तर 6 ते 10 वयोगटातील 09 ( 11.25 टक्के) बालकामगार काम करताना आढळून आले.

1.बालकामगारांच्या पगारांची पाहणे :

कुटुंबाची गरिबी, शिक्षणाविषयी नाआवड व इतर कारणांमुळे बालकामगार हॉटेल मध्ये काम करू लागतो. हॉटेल व्यवसायाच्या दृश्टीने बालकामगार म्हणजे हक्काचा, कमी वेतनावर मिळणारा कामगार होय, हॉटेल मालक बालकामगारांकडून 8 ते 15 तास करून घेतो. परंतू त्या प्रमाणात त्यांना वेतन दिले जात नाही. याविशयी माहिती मिळवून ती पुढील तक्ता क्र. 3 मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क.3

बालकामगारांना मिळणारा दरमहा पगार

| दरमहा वेतन (रूपये) | बालकामगारांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 500 ते 1000 | 07 | 08.75 |
| 1001 ते 1500 | 10 | 12.50 |
| 1501 ते 2000 | 49 | 61.25 |
| 2001 ते 2500 | 12 | 15.00 |
| 2500 पेक्षा जास्त | 02 | 02.50 |
| एकूण | 80 | 100 |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

वरील तक्ता क. 3 वरून असे निदर्शनास येते की, हॉटेल व्यवसायात काम करत असतांना कामाच्या तुलनेने कमी पगार दिला जातो त्यामध्ये सर्वाधिक पगार 15101 ते 2000 रूपये घेणारे 49 ( 61.25 टक्के) बालकामगार होते, तर 2001 ते 25000 रूप्ये पगार घेणारे 12 ( 15.00 टक्के), 1001 ते 1500 रूपये पगार घेणारे 10 ; 12.50 टक्केद्धए 500 ते 1000 रूपये पगार घेणारे 07 ( 8.75 टक्के), तर सर्वात कमी पगार 2500 रूप्ये च्या पुढे पगार घेणारे 2 ( 02.50 टक्के) बालकामगार होते.

1. हॉटेल मधील कामाचे स्वरूप :

आज ब–याच व्यवसायांत बालकामगार काम करतांना दिसून येतात. परंतू बालकामगारांना सर्वात लवकर काम मिळण्याचे ठिकाण म्हणजे हॉटेल होय. हॉटेलच्या आतीत भागात अनेक प्रकारांची कामे मालक वर्गांकडून करून घेतली जातात. त्यामुळे हा बालकामगार हॉटेल मध्ये कोणती कामे करतो तु पुढील तक्ता क. 4 मध्ये दर्शविली आहे.

खालील तक्ता क 4 वरून असे दिसून येते की, हॉटेल मध्ये काम करत असताना बालकामगार कोणत्या स्वरूपाचे काम करत होते, त्यामध्ये सर्वाधिक वेटरचे काम करणारे 34 (42.50 टक्के) बालकामगार होते, भांडी धुणे 19 ( 23.75 टक्के), साफसफाई काम करणारे 14 (17.50 टक्के), हेल्परचे काम करणारे 13 ( 16.25 टक्के) बालकामगार करत होते.

तक्ता क.4

हॉटेल मधील कामाचे स्वरूप

| कामाचे स्वरूप | बालकामगारांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| भांडी धुणे | 19 | 23.75 |
| वेटर | 34 | 42.50 |
| सफाई काम | 14 | 17.50 |
| हेल्पर | 13 | 16.25 |
| एकूण | 80 | 100 |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

***निष्कर्ष :***

या वरून असे स्पष्ट होते की, हॉटेल व्यवसायात काम करणारे बालकामगार आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील असून, त्या बालकामगारांच्या शैक्षणिक विकास होण्याच्या वयात काम करावे लागत असून कामाच्या तुलनेत अत्यंत कमी मोबदला दिला जातो. त्याच प्रमाणे हॉटेल मधील भांडी धुणे, सफाई काम, हेल्पर अशी निष्कृष्ट दर्जाची कामे बालकामगारांना मोठया प्रमाणात करावी लागतात, तसेच भांडी धूत असतांना सारखा पाण्याचा वापर केल्यामुळे शररिक इजा होतात.

ब)बालकामगाराची आर्थिक परिस्थिती :

1.बालकामगारांचे उत्पन्न :

हॉटेल व्यवसायातील काम करणा–या बालकामगारांच्या पालक मध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने, त्या पालकामध्ये चांगले काम करण्याचे कौशल्य अंगात निर्माण होत नाही. त्यामुळे त्यांना अल्प वेतनावर काम करावे लागते, त्यामध्ये कुटूंबाचा मोठा आकार, शिक्षणाचा अभाव, कुटुंबामध्ये न कमवणा–यांची संख्या जास्त, कुटुंबातील लग्न, सण, कुटुंबातील धार्मिक कार्यासाठी, तसेच शेतीतील कामासाठी इ. कारणासाठी मोठया प्रमाणात कर्जे घेत असल्याने दैनंदिन गरजा भागविण्यासाठी कुटुंबातील पालका बरोबर घरातील मुले काम करू लागतात. त्यामुळे बालकामगार कुटुंबाची आर्थिक स्थिती विषयी माहिती पुढील तक्ता क. 5 मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क.5

बालकामगार कुटुंबाना मिळालेले वार्षिक सरासरी उत्पन्न

| मुख्य व्यवसाय | कुटुंबे | कुटुंबास मिळालेले एकूण उत्पन्न | टक्केवारी |
|---|---|---|---|
| शेतीपासून | 61 | 82,350 | 4.49 |
| मजुरीपासून | 46 | 55,200 | 3.01 |
| धुणे–भांडी | 12 | 8,100 | 0.44 |
| बांधकाम | 29 | 1,47,900 | 8.07 |
| बालकामगार | 80 | 14,40,000 | 78.56 |
| इतर मार्गाने | 69 | 99,360 | 5.42 |
| एकूण | 80 | 18,32910 | 100 |
| प्रति कुटुंब सरासरी उत्पन्न | –– | 22,911.38 | |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

तक्ता क. 5 वरून असे दिसून येते की, पिंपरी–चिंचवड शहरातील संशोधनसाठी निवडलेल्या 80 बालकामगारांच्या कुटुंबाना वर्शभरात सर्व मार्गानी एकूण 18,32,910 रूप्ये उत्पन्न मिळाले. ते सरासरी प्रतिकुटूंब 22,911.38 रूपये मिळाले या एकूण सर्व कुटुंबांना मिळालेल्या उत्पन्नात शेतीपासून 61 कुटुंबाना 82,350 ( 4.49 टक्के), मजुरीपासून 46 कुटुंबाना 55,200 ( 3.01 टक्के), धुणी भांडी करणारी 12 कुटुंबाना 8,100 ( 0.44 टक्के), बांधकामापासून 29 कुटुंबांना 1,47,900 ( 8.07 टक्के), 80 बालकामगारांकडून 14,40,000 ( 78.56 टक्के) व इतर व्यवसाय करणारी 69 कुटुंबाना 99,360 ( 5.45 टक्के) रूपये मिळालेले होते.

*निष्कर्ष :*

या वरून असे स्पष्ट होते की, कुटुंबांना वार्षिक सरासरी उत्पन्न 22,911.38 रूपये मिळाले. त्यामध्ये बालकामगारांच्या उत्पन्नाचा वाटा अधिक 78.56 टक्के आहे. यावरून असे स्पष्ट होते की, मिळालेले उत्पन्न अल्प असल्यामुळे त्यांना जीवनावश्यक गरजा देखील भागवता येत नाही. म्हणून घरातील लहान मुलांनाही कामाला पाठवले जाते.

2.बालकामगारांचे कामाचे तास :

हॉटेल व्यवसायातील बालकामगारांना दिवसभरातून किती तास काम करतात यावर त्यांचे उत्पन्न अवलंबून राहते. हॉटेल चालू होण्यापासून ते रात्री बंद होई पर्यंत बालकामगारांना काम करावे लागते. म्हणून बालकामगार दिवसातून किती तास काम करतो याचा अभ्यास पुढील तक्ता कमांक 6 मध्ये दर्शवली आहे.

तक्ता क.6

बालकमिगारांचे कामाचे तास

| कामाचे तास | बालकामगारांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 8 तास | 39 | 48.75 |
| 12 तास | 41 | 51.25 |
| एकूण बालकामगार | 80 | 100 |
| एकूण सरासरी कामाचे तपास | 10.05 | —— |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

तक्ता क. 6 वरून असे निदर्शनास येते की, अध्ययनासाठी निवडलेल्या 80 बालकामगारापैकी सर्वाधिक 41 ( 51.25 टक्के) बालकामगार 12 तास काम करीत होते, तर 39 ( 48.75 टक्के) दिवसातून 8 तास करत होते. तर हॉटेलमध्ये बालकामगारांकडून दिवसातून सरासरी 10.05 तास काम करून घेतले जात होते. यामुळे बालकामगारांच्या कामाच्या स्थिती विशयी माहिती पुढील तक्ता क. 6 मध्ये दर्शविली आहे.

3.हॉटेल कामातील अडचणी :

बालकामगारांना हॉटेलमध्ये करावे लागणारे अपरात्रीपर्यंत काम, मालकाकडून–ग्राहकाकडून मिळणारी अपमानाची वागणूक, तसेच शारिरीक कष्ट, सतत भांडी धुणे, साफ–सफाईची कामे करताना अडचणी येतात. याविषयीची माहिती पुढील तक्ता क. 7 मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क.7

हॉटेल कामातील अडचणी

| अडचणीचा प्रकार | बालकामगारांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| कामाची वेळ जास्त | 68 | 85 |
| कामाच्या मानाने पगार कमी | 50 | 62.50 |
| शाळेत जाता येत नाही | 71 | 88.75 |
| शारिरीक इजा | 78 | 97.50 |
| मालकाकडून मारहाण | 61 | 76.25 |
| ग्राहकाकडून अपमानाची वागणूक मिळते | 49 | 61.25 |
| इतर अडचणी | 63 | 78.75 |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी ( बालकामगारांनी एकापेक्षा जास्त अडचणी सांगितल्या)

तक्ता क. 7 वरून असे दिसून येते की, अध्ययनासाठी 80 बालकामगारांची निवड केली. त्यांना प्रत्यक्ष काम करत असतांना एकापेक्षा जास्त अडचणी उद्‌भवल्या. त्यामध्ये सर्वाधिक 78 (97.50 टक्के) बालकामगारांना शारीरिक इजा, शाळेत जात येत नाही ही अडचण 71 ( 88.75 टक्के), कामाची वेळ जास्त 68 ( 85 टक्के), कामाच्या मानाने पगार कमी 50 ( 62.05 टक्के), ग्राहकांकडून अपमानाची वागणूक मिळत असल्याची 49 ( 61.25 टक्के), तर मालकाकडून मारहाण होण्याचे प्रमाण 61 ( 76.25 टक्के), इतर प्रकाराच्या अडचणी उद्‌भवल्याची तकार असणारे 63 ( 78.75 टक्के) बालकामगार आढळून आले.

*निष्कर्ष :*

या वरून असे स्पष्ट होते की, हॉटेल व्यवसायात बालकामगार काम करत असतांना मालकवर्गाकडून मोठया प्रमाात बालकामगाराचे शोशण होते, तर पगार कमी देवून जास्त वेळ काम करून घेतले जाते, तसेच त्याच्या शारीरिक क्षमते पेक्षा जास्त वेळ काम करून घेतात. बालकामगार काम करत असतांना त्यांच्या आरोग्य विषयी काळजी घेतली जात नाही. बालकामगार अल्पवयीन असल्याने लवकर व्यसनाच्या आहारी जातात.

*शिफारशी :*

1.बालमजुरांना शैक्षणिक सुविधांबरोबरच शिष्यवृत्ती व बालमजुरीतून मुक्त केलेल्या मुलांचे वसतिग्रहात पुनर्वसन करणे.
2.बालमजुरी संपवण्यासाठी प्रौढांना रोजगार उपलब्ध होणे गरजेचे आहे.

3.हगणदारी मुक्त गाव या प्रमाणे बालकामगार मुक्त गाव व शहर अशी योजना राबवावी व प्रोत्साहनासाठी बक्षीस द्यावे.
4.बालमजुरांच्या पालकांसाठी उत्पन्नाचा पर्यायी स्त्रोत पुरविणे.
5.कुठल्याही उद्योगाला परवाना देताना बालकामगार कामावर ठेवणार नाही, अशी हमी मालक उद्योजक यांच्याकडून घेणे. या हमीचे उल्लंघन केले तर परवानाद रद्द करणे.

*संदर्भ :*

1.Economics of Labour and Industrial Evaluation - Dr. R.C.Saxena.
2.Economics of Labour and Labour Welfare - Dr. T. N. Bhagoliwan.
3.खडसे इंदिरा – बालविकास शास्त्र, हिमालय पब्लिशिंग हाउस, मुंबई– 1995.
4.मसिक– कुरूक्षेत्र–मे–2005, 2006, 2010
5.यशदा बालमजुरी निर्मुलन प्रकल्प – 2010
6.बालकामगार योजना – 2008, 2012.
7.दैनिक – सकाळ, पुढारी, लोकमत.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net